# प्रेसनोट

दि.०६/०७/२०२२

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, लष्कर, पुणे येथील उप अभियंता व शाखा अभियंत्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक —<br>१) किरण अरूण शेटे, वय - ३१ वर्षे, उप अभियंता (यांत्रिकी), वर्ग - १<br>२) परमेश्वर बाबा हेळकर, वय ४९ वर्षे, शाखा अभियंता, वर्ग - २<br>दोघेही नेमणूक - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,५००/- ( दोन हजार पाचशे रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,५००/- ( दोन हजार पाचशे रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. ३०/०६/२०२२

सापळा दिनांक :- ०६/०७/२०२२.

ठिकाण :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, लष्कर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार लेबर कॉन्ट्रॅक्टर असून शिवेगांव येथील अंगणवाडीच्या इलेक्ट्रीक व वॉटर प्युरीफायरच्या कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय लष्कर, पुणे येथील अधिकाऱ्यांनी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता शिवेगांव ता. खेड येथील अंगणवाडीच्या इलेक्ट्रीक व वॉटर प्युरीफायरच्या कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय लष्कर, पुणे येथील लोकसेवक शेटे व हेळकर यांनी तक्रारदार यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाच्या २% रक्कमेची लाच मागणी करून आरोपी लोकसेवक हेळकर यानी २५००/- (अडीच हजार रूपये) स्वीकारल्यावर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.